REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 9 | JUNE - 2020

कुलगुरू पद श्रध्दा, निष्ठा कि प्रतिष्ठा — भाग २
शिष्टाचार, वैचारिक स्वीकृतीचा अभाव आणि राजकीय हितसंबंध.

डॉ.तुषार निकाळजे

सध्या भारतामध्ये नव्हे तर संपूर्ण जगात कोरोना या सांसर्गिक रोगाने थैमान घातले आहे. सर्वच घटक याकरीता वेगवेगळया उपाययोजना करण्यात गुंतले आहेत. परंतु काहींना तर याचे काही सोईरी सुतक नाही. याचा वापर ते सेलेब्रिटी, फोटो ॲपॉरच्युनिटी म्हणून करीत आहेत. नुकतीच या पार्श्वभूमीवर एक घटना घडली. एका विद्यापीठाच्या कुलगुरूंनी एका प्रकाशकाच्या काही पुस्तकांचे प्रकाशन स्वत:च्या कार्यालयात केले हा प्रकाशन समारंभ व कुलगुरूंची भूमिका व या भोवतीचे राजकारण यांची चर्चा करण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

१) **शिष्टाचार** :— मा. कुलगुरूंनी ज्या प्रकाशकाची दहा पुस्तके स्वत:च्या शासकिय कार्यालयात प्रकाशित (प्रकाशन सोहळा) केली. त्या प्रकाशकाच्या मासिकात दोन वर्षापूर्वी विद्यापीठ व कुलगुरू यांच्याबाबत नकारात्मक मजकूर छापला होता. त्यामध्ये विद्यापीठातील प्रशासन व कार्यपध्दती ही भ्रष्टाचाराच्या कक्षेत येते असे भाष्य केले होते या कुलगुरू महोदयांच्या फोटोसहीत हा लेख प्रकाशित झाला होता आणि आता त्याच प्रकाशकांच्या पुस्तकांचे प्रकाशन मा.कुलगुरूंना शिष्टाचाराबद्यल किती माहिती आहे ? याची शंका येते व्यक्ती स्वातंत्र्य आहे याबद्यल शंका नाही परंतु आपण जेव्हा समाजामध्ये एक जबाबदार पद घेवून मिरवत असतो, तेव्हा शिष्टाचार सांभाळणे गरजेचे असते.

२) **सामाजिक अंतर (सोशल डिस्टंसिंग)** :— आज जगभरात सोशल डिस्टंसिंग तोंडाला व नाकाला मास्क वापरण्याची पध्दत, बंधने आहेत परंतु मा.कुलगुरूंच्या कार्यालयात कुलगुरूंसहीत इतर मास्क न लावता, जवळजवळ उभे राहून (सोशल डिस्टंसिंग न ठेवता) फोटो काढून कार्यक्रम साजरा केला. याचे गांभीर्य मा. कुलगुरूंना राहिले नाही असे वाटते. विद्यापीठाने लॉकडाऊनच्या कालावधीत एक परिपत्रक जाहिर केले आहे. विद्यापीठ आवारात कर्मचा—यांचे नातेवाईक व ओळखीचे मित्र यांना प्रवेश मनाई. कारण हे कोणत्या झोनमधून (रेड झोन, ऑरेंज झोन, कंटेन्मेंट झोन) आले आहेत त्याची कल्पना नसते आणि त्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव होवू शकतो. या प्रकाशन व लेखक व पाहुण्यांचे व्हेरीफिकेशन केले होते का ? असाही प्रश्न उपस्थित होतो.

याआधी पाच दिवसांपूर्वी या विद्यापीठातील काही सेवकांची सेवानिवृत्ती झाली सेवानिवृत्ती हा प्रत्येकांच्या आयुष्यातील भावनिक प्रसंग असतो. परंतु अशावेळा एका मोठया हॉलमध्ये (किमान २०० लोकांची क्षमता) फक्त २० ते ३० कर्मचारी, प्रशासकिय अधिकारी व स्वत: मा. कुलगुरू यांनी सोशल डिस्टंसिंग, मास्कचा वापर करून समारंभ केला होता. मग हे प्रकाशक व लेखक यांना स्वत:च्या कार्यालयात बोलावून विनामास्क, विना सोशल डिस्टंसिंग प्रकाशन समारंभ आयोजनाचे काय महत्व?

या कुलगुरूंच्या इतर काही निवडक कृतींचे अवलोकन पुढीलप्रमाणे :—

३) **प्रसार माध्यमांचे समन्वयक** :— मा. कुलगुरूंनी स्वत:च्या अधिकारात प्रसार माध्यमांचे समन्वयक हे पद निर्माण केले. मग या पुस्तक प्रकाशनाच्या वेळी या समन्वयक महोदयांचा सल्ला का घेतला नाही?

किंवा मा. कुलगुरूंना समन्वयक महोदयांनी माहिती/सल्ला दिला नाही. या अनुषंगाने कुलगुरू कार्यालयात शासनाने नेमून दिलेल्या पदाव्यतिरिक्त इतर पदे का? कुलगुरू कार्यालयात १९४८ते २०१८ पर्यत सांखिकी विश्लेषक हे पद नव्हते किंवा तसा पदाधिकारी देखील नव्हता. परंतु सध्या असा अधिकारी कार्यरत आहे. याला कोणते हितसंबंध म्हणतात?

४) अपात्र अधिका–यास क्षमापित :– विद्यापीठातील एक वर्ग दोनचा अधिकारी गेले २० वर्षे विद्यापीठात कार्यरत आहे. एका माहिती अधिकारी सामाजिक कार्यकर्त्याने या अधिका–याच्या पात्रतेसंदर्भात मा. कुलगुरूंकडे तक्रार केली असता मा. कुलगुरूंनी मा. उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधिशांची सत्यशोधन समिती नेमली. या संशोधन समितीने त्या अधिका–यास अपात्र ठरविले. परंतु मा. कुलगुरू व अधिकार मंडळाने या अधिका–यास क्षमापित केले. परंतु या प्रकरणात आश्चर्य म्हणजे शिक्षण विभागाचे पदाधिकारी विद्यापीठ अधिकार मंडळाचे सदस्य आहेत. त्यांनी शासनाच्या अधिकारांचा वापर का केला नाही? या क्षमापित केलेल्या अधिका–याची इतर काही प्रकरणे इतकी वाईट आहेत की त्यामुळे विद्यापीठाची अब्रू जावू शकते.

५) बोगस पदवीधारक अधिका–यास क्लिन चिट :– या कुलगुरूंच्या कार्यकिर्दित दुस–या एका विद्यापीठ अधिका–याच्या पी.एच.डीचे प्रकरणाचा तक्रार अर्ज सादर झाला. परंतु मा. कुलगुरूंनी सदर प्रकरण चौकशी किंवा शहानिशा न करता बंद केले. सदर प्रकरण विद्यापीठ अनुदान आयोगाचे निकष किंवा नियम तरी तपासून बंद करावे अशी अपेक्षा. परंतु तसे झाले नाही. शासन किंवा विद्यापीठ अनुदान आयोग नियम का तयार करतात? या प्रकरणात मा. कुलगुरूंचे व या अधिका–याचे कोणते हितसंबंध? किंवा कोणाचे हात कोणाच्या दगडाखाली अडकलेले आहे. सध्या हा अधिकारी मंत्रालयात एका मंत्र्याच्या कार्यालयात कार्यरत आहे. त्यास मा.कुलगुरूंनी बिनशर्त ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

६) एका अधिका–याची गुडगेदुखी झाली १५७ कर्मचा–यांची डोकेदुखी :– दर पाच वर्षांनी अधिकार मंडळे बदलतात, अगदी कुलगुरू, प्र–कुलगुरू, कुलसचिव, वित्त अधिकारी, अधिष्ठाते, अभ्यास मंडळे इत्यांदीसहित मा. कुलगुरूंच्या काळात एका अधिका–याची नवीन नियुक्ती झाली. त्याचे पदाचे कार्यालय गेली २० वर्षे एका इमारतीमधील दुस–या मजल्यावर आहे. त्या इमारतीला लिफ्ट नाही. परंतु या अधिका–यास गुडघेदुखीचा त्रास हातो कि होवू नये यासाठी त्यांचे कार्यालय दुस–या एका इमारतीमधील पहिल्या मजल्यावर (लिफ्ट असलेल्या ठिकाणी) स्थलांतरीत करण्यात आले. त्याकरीता जवळपास नुतनीकरण्यासाठी १८ ते २० लाख रूपयांचा खर्च झाला असावा. परंतु ज्याठिकाणी हे कार्यालय स्थलांतरीत झाले, त्याठिकाणचे १५७ कर्मचारी व अधिकारी दुस–या इमारतीमधील दुस–या, तिस–या मजल्यावर स्थलांतरीत करण्यात आली. या इमारतीस लिफ्ट नसल्याने ॲन्जीओप्लास्टी झालेले कर्मचारी, गुडगे, कंबर, मान, मनका यांचा त्रास असणा–या महिला व पुरूष कर्मचा–यांना पायी जीने चढून जावे लागते. या इमारतीमध्ये दिव्यांग/अपंग विद्यार्थी व प्राध्यापकांनादेखील असा मार्ग अवलंबावा लागतो. या इमारतीची पाहणी दस्तुरखुदद् मा. कुलगुरूंनी केलेली असते तरी देखील ही परिस्थिती का? आणि आता तर या कोरोनासारख्या रोगांमध्ये येथील सामाजिक अंतराचा (सोशल डिस्टंसिंग) फज्जा उडाला आहे.

७) आय.एस.ओ. मानांकन :–विद्यापीठाच्या सर्व विभागांचे आय.एस.ओ. मानांकन करण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषदेने दोन वर्षापूर्वीच ठराव मंजूर केला. परंतु आजपर्यत त्यावर सर्वेक्षण व कार्यपूर्तता नाही. यामुळे घरबसल्या विद्यार्थी, त्यांचे पालक, महाविद्यालयातील कर्मचारी, प्राध्यापक, संशोधक, विद्यापीठातील सर्व विभागांचे कामकाज सुरळीत व कमी वेळात होवू शकते. आजच्या कोरोना सारख्या आजाराच्या प्रसंगी सोशल डिस्टंसिंग साधून काम करता येवू शकते. तसेच गर्दी झाल्यामुळे सुरक्षा व्यवस्थेचा ताण व विद्यार्थ्यांचा ताणही कमी होवू शकतो, बहुधा याचा विसर पडला असावा.

८) ई–कन्टेन्ट स्टुडिओची जाग :– वर्ष २०१५ मध्ये एक कोटी रूपये खर्चून बांधलेला इ–कन्टेन्ट स्टुडिओ बांधण्यात आला. परंतु गेल्या पाच वर्षात त्याचा विसर पडला असावा. कोरोनाच्या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमिवर त्याची आठवण झाली. आणि आम्ही काहीतरी जगावेगळे करीत आहेत याची जाहिरात करण्यात आली तेवढीच सेलेब्रेटी होण्याची संधी.

९) निवडणूक कामात सेलिब्रिटी :– २०१९ मध्ये संपन्न झालेलया लोकसभेच्या निवडणूकांपूर्वी मतदार नावनोंदणीचे आवाहान करण्यासाठी जिल्हा निवडणूक आयुक्तांनी विद्यार्थ्याशी संवाद साधला असता, मा. कुलगुरूदेखील तेथे गेले व निवडणुका, मतदान याबद्यल भाषणबाजी आणि वर्तमानपत्रात फोटो आणण्याचा प्रयत्न करताना दिसतात. परंतु विद्यापीठ कार्यालयातील एका अधिका–याने निवडणुक कामांत विनाकारण हस्तक्षेप केल्याप्रकरणी आलेल्या तक्रार अर्जावर मा.कुलगुरू, महोदय मौन धारण करतात. वर्ष २०१८ मध्ये शासनाने

लोकशाही, निवडणूक व प्रशासन हा अभ्यासक्रम सुरू करण्याचे परिपत्रक काढले पण विद्यापीठात अद्याप अमंलबजावणी नाही.

१०) विद्यापीठ लोगोचा गैरवापर :– कधी कधी विद्यापीठाच्या एखादया सार्वजनिक कार्यक्रमांत कामगार संघटनेच्या पदाधिका–याचे पुस्तक प्रकाशनाचे कामही केले जाते. त्यावेळी संघटनेच्या पदाधिकारी बॅनर लावतो व त्यावर विद्यापीठाच्या लोगोचे चित्रदेखील प्रिन्ट करतो. नियमानुसार कोणत्याही शासकीय कार्यालयाचा लोगो वापरण्यास इतरांना मनाई आहे. तरी देखील? या कामगार संघटनेच्या पदाधिका–याचे व मा.कुलगुरूंचे कोणते हितसंबंध?

११) कुलगुरूंवर फौजदारी याचिका :– विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी मा. कुलगुरूंविरूध्द फौजदारी याचिका दाखल करणे ही शिक्षण क्षेत्रातील लाजिरवाणी बाब आहे.

१२) लॉकडाऊनमध्ये कर्मचा–यांना प्रशासकीय कामकाजाचे तांत्रिक शिक्षणाचे ऑनलाईन प्रशिक्षण :– सध्या ऑनलाईन कामकाजावर भर दिला जात आहे. परंतु याचा पुर्वइतिहास, पुर्वानुभव, कर्मचा–यांची पात्रता, त्यांचे आकलन यांचा विचार न करता फक्त आठ दिवसांत तांत्रिक शिक्षण देवून कर्मचा–यांना 'पी हळद आणि हो गोरी' किंवा कोणत्यातरी कंपनीचा साबण किंवा क्रिम वापरून गोरेपण आणण्याचा दावा करणा–या कंपन्यांची आठवण होते. विद्यापीठांत वर्ग–३ चे अंदाजे २५२ कर्मचारी आहेत, त्यातील ३९ कर्मचारी १२ वी उत्तीर्ण, ४७ कर्मचारी १० वी उत्तीर्ण, ०३ कर्मचारी अकरावी व इतर बी.ए., बी.कॉम, एम.ए., एम.कॉम झालेले, यातील ५० टक्के मराठी माध्यम घेवून उत्तीर्ण झालेले असतील तर त्यांना तांत्रिक भाषा सात दिवसांत अवगत होईल का? या तांत्रिक शिक्षणात ईन्फॉर्मेशन सेक्युरिटी कन्सेप्ट व बेसीक प्रॅक्टिसेस ऑन्टीव्हायरस सॉफ्टवेअर सारख्या विषयांच्या प्रशिक्षणाचा समावेश केला आहे परंतु हे विषय एम.एस.सी. (आय.टी), एम.सी.ए. (अभियांत्रिकी), एम.एस.सी. (संगणक) या विषयांच्या विद्यार्थ्यांच्या अभ्याक्रमात समावेश असतो याचा बहुधा विसर पडलेला दिसतो. वरीलपैकी २५२ कर्मचा–यापैकी काही सुरक्षा, शिपाई वर्गातून पदोन्नती झालेले व सेवानिवृत्तीला दोन–तीन वर्षे उरलेली आपण काय करतो याच भान ठेवणे आवश्यक वाटत नाही का?

१३) कायदा अधिका–याच्या पीएच.डी. मौखिक परिक्षेलर कुलगुरूंची उपस्थिती :– आपणांस माहित असेल कोणत्याही संशोधकाने पीएच.डी. प्रबंध सादर केल्यानंतर त्या प्रबंधांची तीन तज्ञामार्फत होते या तपासणीचा अहवाल आल्यानंतर संशोधकांची अंतिम मौखिक परीक्षा होते व त्यानंतर पीएच.डी. निकाल जाहिर केला जातो. विद्यापीठातील कायदा अधिका–याच्या मौखिक परीक्षेला मा.कुलगुरू उपस्थित असतात. परंतु इतर कर्मचारी किंवा अधिका–याच्या पीएच.डी. मौखिक परीक्षेस उपस्थित नसतात. हा भेदभाव का? फक्त कायदा अधिका–याची पीएच.डी. व संशोधन महत्वाचे, परंतु इतरांचे कवडीमोल आहे का? पण यामध्ये एका हितसंबंधाचा वास येतो. मा.कुलगुरूंच्या कारकिर्दीत जर कायदा अधिका–याने चुकीचे सल्ले दिले तर कुलगुरू महोदयांचे पद धोक्यात येवू शकते या भितीपोटी हे हितसंबंध जोपासण्यासाठी मा.कुलगुरूंची कृती असावी.

१४) काश्मीरच्या सफरचंदावर संशोधन :– जानेवारी २०१९ काश्मीर संदर्भात कलम ३७० च्याबाबत केंद्रसरकारने भूमिका घेतली. गेली ६० वर्ष प्रलंबित असलेला प्रश्न सुटला. त्यावेळी मा.कुलगुरूंनी काश्मीरमध्ये सफरचंदावर संशोधन करण्याचे संशोधन केंद्र चालू करण्याचे जाहिर केले. यापेक्षा काश्मीरच्या सामाजिक, प्रशासकीय, शैक्षणिक विषयावर भाष्य केले असते, तर बरे झाले असते. परंतु यापूर्वी काश्मीरच्या कोणत्याही प्रश्नावर मा.कुलगुरूंनी मौनव्रत का घेतले होते? किंवा आपण या सगळया प्रकरणात कुठेतरी झळकावे हा प्रयत्न.

१५) चौकशी समित्यांचे अहवाल गुलदस्त्यात :– एक दिड वर्षापूर्वी प्रश्नपत्रिका फूटी प्रकरणी मा.कुलगुरूंनी चौकशी समिती नेमली होती. परंतु आजपर्यंत हा अहवाल किंवा कार्यवाहीचा कोठेही जाहिर उल्लेख नाही. कारण या एका चौकशी समितीच्यामुळे गेल्या दहा वर्षातील गुणवाढ प्रकरणे, नोकर भरती गैरप्रकार, निकालपत्राबद्दल इत्यादी वरील प्रकरणे उघडकीस आली असती आणि यामुळे विद्यापीठ बदनाम झाले असते व याचा ठपका कुलगुरू महोदयांवर आला असता म्हणजे भविष्यात कुलगुरूंना इतरत्र कुठेही संधी मिळाली नसती, याची सतर्कता घेतली असावी . तसेच राष्ट्रीय किंचस आंतरराष्ट्रीय मानांकनही तळाला गेले असते, याचीदेखील दक्षता घेण्यात येते.

या लेखात वरील काही कृतींची चर्चा केली आहे. इतर ब–याच बाबींवर चर्चा केल्यास एक संशोधनाचा स्वतंत्र विषय होवू शकेल. वास्तविक कुलगुरू हे शिक्षण व समाजातील पवित्र श्रध्दास्थान आहे. कारण ते भावी पीढी व समाज निर्मीतीचे केंद्रस्थान आहे. विद्यापीठ कायदे, शासनाचे नियमानुसार ते प्रशासकीय पद तर आहेच. परंतु आत ते राजकिय होत चालले आहे. राजकारण म्हटले की हितसंबंध आलेच ते वैयक्तिक, सामूहिक असणे स्वाभाविक. परंतु त्यामुळे या पदाचे शिष्टाचार, नैतिकता जपण्याचा प्रयत्न अपेक्षित आहे.

संदर्भ :

१. घनश्याम पाटील यांच्या 'दरवळ' चे कुलगुरूंच्या हस्ते प्रकाशन : दै.तरूण भारत : दिं. ६ जून २०२०.
२. बुध्दीला चालना देणारी पुस्ते महत्वाची : दै.केसरी दिं. ७ जून २०२०.
३. 'चपराक' च्या दहा ई–बुक्सचे प्रकाशन, दिं. ७ जून २०२०.
४. विद्यापीठ की भ्रष्टाचाराचे कुरण :– मासिक साहित्य चपराक, डिसेंबर २०१७ पृष्ठ १४,१५, १६, १७
५. विद्यापीठ माहिती अधिकार कार्यालयाचे पत्र जा.क्र.२१५१ दिं.१७/१२/२०१२.
६. कुलगुरू पद श्रध्दा निष्ठा कि प्रतिष्ठा :– साप्ताहिक चपराक, दिं. २४ ते ३० एप्रिल २०१७ पृष्ठ ०४.
७. विद्यापीठाशी नाळ असलेला कुलगुरू हवा : दै. सकाळ दिं. ९ मे २०१७ पृष्ठ ७.
८. कुलगुरू हा प्रशासकीय अधिकारी असावा :– दै. सकाळ दिं. १३ सप्टेबर २०१७ पृष्ठ ४.
९. विद्यार्थ्यांसाठी वेळ राखीव ठेवावा :– दै. लोकमत दिं. २६ जुलै २०१८.
१०. डुप्लीकेट गुणपत्रिका पडली महागात :– दै. सकाळ दिं. १८ जानेवारी २०१२ पृष्ठ ४.
११. प्रश्नपत्रिका फुटीच्या चौकशीसाठी पुन्हा समिती :– दै. लोकमत, हॅलो पुणे, दिं. २ मार्च २०१९.
१२. विद्यापीठाचे परिपत्रक जावक क्रं.सु.वि.२११/२०२० दिं. ३१/०५/२०२०.
१३. व्यवस्थापन परिषद ठराव क्रं. ५०/दिं. ३१/०८/२०१८.
१४. मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक आयोग, पुणे व मा. कुलगुरू यांना दिलेले पत्र दिं. २६/०३/२०१९.
१५. मा.कुलगुरू यांना दिलेले पत्र दिं. ०९/०२/२०१८.
१६. व्हाईट कॉलर क्राईम ॲन्ड क्रिमीनल करिअर्स (इंग्रजी) डेव्हीड विंसबर्ग, एलिन वरशिंग, एलेन एफ.चॅएन.

डॉ.तुषार निकाळजे